डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१
दूरध्वनीक्र. ०२०-२६३४३६००/२६३३३३३०/२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

जा.क्र/बार्टी-पुणे/BANRF-२०२२/२०२४-२५/ ५८७ दिनांक २३/०१/२०२५

**परिपत्रक**

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF)-२०२२ अंतर्गत मूळ कागदपत्रे पडताळणी करीता अनुउपस्थित विद्यार्थ्यांकरिता शेवटची संधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती अंतर्गत BANRF-२०२२ अंतर्गत ७६३ विद्यार्थ्यांना मूळ कागदपत्रे पडताळणी करीता दि. १२/०९/२०२४ ते २७/०९/२०२४ या कालावधीत बार्टी, मुख्यालय येथे पार पडली सदर कालावधीत एकूण ११९ विद्यार्थी मूळ कागदपत्र पडताळणी करिता उपस्थित अशा विद्यार्थ्यांची यादी बार्टीच्या संकेतस्थळावर दि.१५/१०/२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आली. त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन अनुउपस्थित विद्यार्थ्यांना मूळ कागदपत्रे पडताळणी करीता शेवटची संधी म्हणून दिनांक ०७/१०/२०२४ रोजी बोलविण्यात आले सदर घोषणापत्रानुसार एकूण ३ विद्यार्थी मूळ कागदपत्र पडताळणी करीता उपस्थित राहिले आहेत.

BANRF-२०२२ अंतर्गत अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून या करिता अनुउपस्थित विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्र पडताळणी करिता शेवटची संधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय बार्टी प्रशासनाने घेतला आहे. अनुउपस्थित विद्यार्थ्यांकरिता मूळ कागदपत्र पडताळणी करिता शेवटची संधी देण्यात येत आहे. यानंतर कोणतीही संधी देण्यात येणार नाही याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. कागदपत्रे पडताळणी करिता देण्यात आलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे. मूळ कागदपत्र पडताळणी करीता विद्यार्थ्यांनी बार्टी, पुणे जुने सर्किट हाऊस, २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प पुणे- ४११००१ या पत्त्यावर मूळ कागदपत्रासह दि. ३०/०१/२०२५ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजेपासून ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपस्थित राहावे.

स्वाक्षरी/-
(उमेश सोनावणे)
विभागप्रमुख
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व
प्रशिक्षण संस्था, बार्टी, पुणे